शनिवार, १९ मार्च २०२२

राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २४०
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड


## अंतरंग

राजू शेट्टी महाविकास आघाडी सरकारवर नाराज/२

उरण आवरे येथील तलाव सुशोभिकरणाचे भूमिपूजन/३

कशेडी घाटात टेम्पोच्या धडकेने एक जण ठार, तिघे जखमी/४

## ‘महाविकास आघाडीचे २५ आमदार भाजपच्या संपर्कात’



**मुंबई :** निवडणुका लागल्या की महाविकास आघाडीतील आमदार भाजपमध्ये येतील, असा दावा केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी केला आहे. महाविकास आघाडीचे २५ आमदार अधिवेशनावर बहिष्कार टाकणार होते, परंतु ते सावरले आणि बहिष्कार टाकला नाही. जशा निवडणुका लागतील तसे ते सर्वजण भाजपत येतील. ते आमच्या संपर्कात असल्याचेही दानवे यांनी म्हटले आहे. ते एका वृत्तवाहिनीशी बोलत होते. या वेळी त्यांनी शिवसेनेवर सडकून टीका केली. ज्या दिवशी शिवसेनेने आम्हाला सोडले आणि त्यांच्यात जाऊन मिळाले तेव्हाच त्यांचा भगवा रंग संपुष्टात आला. आता त्यांनी हिरवे पांघरून घेतलेय आणि ते हिरव्याचे समर्थन करतात. फक्त उरलेली इज्जत वाचवण्यासाठी सध्या ते भगवा-भगवा करीत असतात. त्यामुळे भेसळ आमच्यात आहे की त्यांच्यात हे त्यांनी तपासून पाहावे, असा टोलाही दानवे यांनी लगावला.

## काळा दिन पाळून केलेल्या रास्ता रोको आंदोलनात सिडकोच्या नावाने शिमगा

# २४ जूनला एक लाख प्रकल्पग्रस्त रस्त्यावर उतरणार

**पनवेल : हरेश साठे**

**येत्या २४ जूनला एक लाख प्रकल्पग्रस्त रस्त्यावर उतरणार आहेत. त्यामुळे सिडको आणि राज्य सरकारच्या विरोधात काही तरी भयंकर घडणार आहे, अशी भविष्यवाणी करीत ’न भुतो न भविष्यती’ आंदोलनाचा गर्भित इशारा काळा दिन आंदोलनातून सिडको आणि राज्य सरकारला देण्यात आला आणि तशी घोषणा लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील यांनी केली. या वेळी रखरखत्या उन्हात सिडकोच्या नावाने शिमगा करण्यात आला तसेच येत्या काळात सिडको आणि राज्य सरकारच्या उरात धडकी भरवणारे निर्णय घेण्यात येतील असे या आंदोलनातून अधोरेखित करण्यात आले.**



(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ६ वर...

९५ गावांमधील सिडकोपीडित प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समिती व इतर प्रकल्प समित्यांच्या वतीने दास्तान फाटा येथे काळा दिन आणि रास्ता रोको आंदोलन केले. या वेळी लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, आमदार महेश बालदी, सरचिटणीस कॉम्रेड भूषण पाटील, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, अतुल पाटील, २७ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, खजिनदार जे. डी. तांडेल, दशरथ भगत, राजेश गायकर, भाजपचे उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह, कामगार नेते सुरेश पाटील, अरुण जगे, महापालिका स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, नगरसेवक अभिमन्यू पाटील, अमर पाटील, प्रवीण पाटील, नगरसेविका हेमलता म्हात्रे, युवा नेते दशरथ म्हात्रे, न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, कामगार नेते सुधीर घरत, सुनील घरत, यांच्यासह प्रकल्पग्रस्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जासई जन्मगावी त्यांच्या स्मृतींना अभिवादन करून १७ मार्च या सिडकोच्या वर्धापन दिनी पनवेल, उरण व बेलापूर पट्ट्यातील या क्रांतिभूमीतून ‘दिबां’च्या पुण्यतिथी दिनी म्हणजेच २४ जूनचा एल्गार जाहीर करतानाच आजपासून त्याची तयारी आणि नियोजन सुरू असल्याचे स्पष्ट झाले.

## भूमिपुत्रांच्या गगनभेदी घोषणा

*आंदोलनाला हिंसक वळण लागू नये यासाठी या वेळी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात होता. तरीही भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांनी रखरखत्या उन्हात सिडकोच्या नावाने शिमगा केला. ‘अमर रहे अमर रहे, दिबा पाटीलसाहेब अमर रहे’, ‘विमानतळाला दिबासाहेबांचे नाव मिळालेच पाहिजे’, ‘सिडको हाय हाय’, ‘प्रकल्पग्रस्त एकजुटीचा विजय असो’, ‘ताई माई अक्का, एमडीला मारा धक्का’, ‘सिडको हटाव भूमिपुत्र बचाव’, ‘जमीन आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची’ अशा गगनभेदी घोषणा या वेळी देण्यात आल्या.*

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाबाबत १८ एप्रिल २०२१ रोजी सिडको संचालक मंडळाने केलेला ठराव विखंडित करून लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा ठराव मंजूर करण्यात यावा, जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना विनविलंब १२.५% भूखंड वाटप करण्यात यावे, २५ फेब्रुवारी २०२२ रोजी गरजेपोटी बांधकामांच्या बाबतीत प्रसिद्ध झालेल्या शासन निर्णयाबाबत प्रकल्पग्रस्तांना विश्वासात घेऊन योग्य ते बदल करण्यात यावेत तसेच नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या सर्व प्रलंबित मागण्या बैठका घेऊन सोडविण्यात याव्यात या मागण्यांसाठी गुरुवारी जोरदार रास्ता रोको करण्यात आला. आंदोलन तीव्र होऊ नये यासाठी पोलिसांनी समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, आमदार महेश बालदी, भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, कॉम्रेड भूषण पाटील, २७ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, दशरथ भगत तसेच महिला आंदोलकांना ताब्यात घेतले व त्यानंतर त्यांची सुटका करण्यात आली.

या वेळी सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील म्हणाले की, २४ जूनच्या आंदोलनात सर्व ताकदीनिशी तयारी करून उतरायचे आहे. पालघरमधील मंडळी १५ ते २० हजार लोकांचा ताफा घेऊन गुजरात महामार्ग, भिवंडीवाले २० हजार लोकं घेऊन नाशिक महामार्ग, ठाणे, कल्याण, डोंबिवलीवाले त्यांच्या भागातील रस्ते त्याचबरोबर रायगड, नवी मुंबईवाले पुणे तसेच गोवा महामार्ग बंद करण्याचा मानस करून आहेत. तशी चर्चा झाली आहे, पण अंतिम नियोजन येत्या कालावधीत होईल. केवळ आश्वासन नको, तर एक महिन्याच्या आत जेएनपीटी साडेबारा टक्के कार्यवाही सुरू झाली पाहिजे; अन्यथा या मागणीसाठी पुन्हा आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही. जोपर्यंत सर्व मागण्या प्रकल्पग्रस्तांच्या पदरात पडत नाही तोपर्यंत लढा सुरूच राहणार आहे. २४ जूनला किमान ११ जिल्ह्यांत आंदोलन होईल आणि त्या तयारीला वेग येईल, असेही त्यांनी सांगितले.

सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी म्हटले की, सिडकोलाही आता समजतंय आपण यांना त्रास दिला तर ही लोकं आपल्याला इथे ठेवणार नाहीत आणि तशा दृष्टीने ते चर्चेला येतात. मागच्या आंदोलनामुळे एक एक यश प्रकल्पग्रस्तांच्या पदरात पडत आहे. दि. बा. पाटीलसाहेबांच्या नावाचा प्रस्ताव अद्याप मंजूर केला नसला तरी पूर्वीचा बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा आग्रह न धरता तो दाबून ठेवला आहे. म्हणून ५० टक्के आपला विजय झाला आहे. विमानतळबाधित २७ गावांचे प्रश्न आहेत, उरण तालुक्यातील जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न आहेत. हे सगळे प्रश्न सोडविण्याकरिता आपला आग्रह कायम राहिला आहे. प्रकल्पग्रस्तांची जिद्द मोठी आहे आणि या ठिकाणीच १६ जानेवारी १९८४ रोजी ती दिसली. सर्व बाजूकडून पोलिसांची फौज चाल करीत आली आणि आम्ही मध्यभागी होतो. मी स्वतः त्यामध्ये हजर होतो. पोलिसांनी गर्जना केली ’पळा जाता की नाही एक मिनिटात!’, आम्हीपण उत्तर दिले, नाही आम्ही येथून हलणार नाही जोपर्यंत प्रश्न सुटत नाही तोपर्यंत. **(पान २ वर..)**

### किमान ११ जिल्ह्यांमध्ये जोरदार आंदोलन होईल
### -दशरथदादा पाटील

आंतराष्ट्रीय विमानतळ झाले पाहिजे याबद्दल दुमत नाही, पण त्या विमानतळाला ‘दिबां’चे नाव लागलेच पाहिजे हे अंतिम सत्य आहे; अन्यथा फार मोठी क्रांती घडेल आणि त्याशिवाय पर्याय राहणार नाही. या भागातील तसेच नवी मुंबईतील काही भागांतील प्रकल्पग्रस्तांना प्लॉट दिले गेले नाहीत. नगरविकास खात्याकडून काही प्लॉट विकले गेले आहे असे समजते आणि त्याचाही अभ्यास सुरू आहे. ४० वर्षे होऊन सिडको प्रश्न मार्गी लावत नाही. त्यामुळे सातत्याने आपल्याला आंदोलने करावी लागतात. दि. बा. पाटील आमच्या जीवनातील आदर्श आहेत. त्यांच्या आशीर्वादाने आंदोलनाची यशस्वी वाटचाल होत असून हा लढा सर्व मागण्या पूर्ण होईपर्यंत थांबणार नाही. येत्या २४ जूनला किमान ११ जिल्ह्यांत आंदोलन होईल आणि किमान एक लाख लोकांचा जनसमुदाय रस्त्यावर उतरणार असून त्याच्या तयारीला सुरुवात झाली आहे, असे सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील यांनी सांगितले.

### ...तर सिडको समुद्रात बुडवायला लागेल
### लोकनेते रामशेठ ठाकूर

दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव विमानतळाला मिळालेच पाहिजे हे आपले धेय्य ठरलेले आहे आणि सिडको ही प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत जो अन्याय करतेय तो दूर करण्यासाठी आणि प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा उभारलेला आहे. संघर्ष करून लोकांना त्रास देण्याचा आमचा धंदा नाही आणि ते काम आम्ही करणार नाही. फक्त प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण झाल्या पाहिजेत याच आमच्या रास्त अपेक्षा आहेत. सिडको जर चांगले नियोजन करीत असेल तर ठीक आहे, पण हे करताना स्थानिकांचा विचार करीत नसतील, तर सिडको काहीही उपयोगाची नाही. ती सिडको समुद्रात बुडवायला लागेल आणि एक दिवस तोही येईल, असा इशारा सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी दिला.

या आंदोलनात महिला रणरागिणीसारख्या तळपळत्या उन्हात ठामपणे होत्या. त्यांचा आवाज बुलंद होता. त्यांचे कौतुक करू तेवढे कमी आहे, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी आवर्जून नमूद केले.

### सर्व मागण्या पूर्ण होईपर्यंत लढा कायम राहणार -आमदार प्रशांत ठाकूर

१७ मार्च सिडकोचा स्थापना दिवस. सिडकोच्या दृष्टिकोनातून कदाचित तो अभिमानास्पद दिवस असेल, पण या दिवशी प्रकल्पग्रस्तांना संघर्ष करावा लागत आहे. त्यामुळे लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय समितीने निर्णय घेतला की, लोकनेते दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव विमानतळाला मिळाले पाहिजे आणि प्रकल्पग्रस्तांचे जे काही प्रलंबित प्रश्न आहेत ते सोडविण्याच्या दृष्टिकोनातून क्रांतिभूमी दास्तान फाटा येथे रास्ता रोको करायचा. त्या अनुषंगाने आज आंदोलन पुकारले असून जोपर्यंत प्रकल्पग्रस्तांच्या सर्व मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत कितीही काळ लागो लढा यशस्वी होत नाही तोवर थांबायचे नाही, असा निर्धार सर्वपक्षीय कृती समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केला.

**“आज आपण या आंदोलनाची हाक दिली म्हणून परवा समितीबरोबर सिडको एमडींनी बैठक घेतली. त्यांनी विमानतळ नामकरणाचा प्रश्न राज्य सरकारच्या अखत्यारीतील आहे असे सांगितले. त्यामुळे आमचे महाराष्ट्र सरकारला आव्हान आहे की बऱ्या बोलाने लोकभावना लक्षात घेऊन बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा प्रस्ताव विखंडित करावा आणि दि. बा. पाटीलसाहेबांच्या नावाचा ठराव सिडकोने करावा आणि त्यासाठी आम्ही शेवटपर्यंत लढत राहू, कारण तो आमच्या अभिमानाचा मुद्दा आहे. भावी पिढीच्या भविष्यासाठी हा लढा आहे. -कॉ. भूषण पाटील**

### प्रकल्पग्रस्तांच्या एकजुटीचा विजय -आमदार महेश बालदी

आज होळी असतानाही मोठ्या संख्येने प्रकल्पग्रस्त बंधू-भगिनी आंदोलनात सहभागी होऊन दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव विमानतळाला देण्यासाठी आग्रही आहेत हे आपण दाखवून दिले. त्यासाठी मी प्रथम सर्वांचे आभार मानतो. गेल्या १० जूनपासून आपण ‘दिबां’च्या नावाचा आग्रह धरत राज्य सरकारला आहे तेथे थोपवण्यात यश मिळविले आहे. १० जूनला आपण मानवी साखळी आंदोलन केले, २४ जूनला सिडको भवनाला घेराव आंदोलन, ९ ऑगस्टला मशाल मोर्चा, १३ जानेवारीला निर्धार परिषद, तर २४ जानेवारीला विमानतळ काम बंद आंदोलन केले. या सर्वांचा परिपाक असा झाला की, राज्य शासनाने बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा प्रस्ताव सिडकोकडून करून घेतलेला तो कॅबिनेटमध्ये मंजूर केला नाही किंबहुना आणला नाही हे समिती व प्रकल्पग्रस्तांनी केलेल्या आजपर्यंतच्या लढ्याचे फळ आहे, असे आमदार महेश बालदी यांनी म्हटले.





**श्रीवर्धन, अलिबाग : रायगड जिल्ह्यात होळीचा सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी रंग लावून धुळवडीचा आनंद लुटण्यात आला.**

## पनवेलमध्ये आज ’गीतांजली’
### देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त संस्कार भारती, उत्तर रायगड जिल्हा, पनवेल समिती आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. १९) सायंकाळी ४.३० वाजता गीतांजली हा देशभक्तीपर गीतांचा सुरमयी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात हा कार्यक्रम होणार असून या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून इतिहास संशोधक, अभ्यासक, लेखक चंद्रकांत शहासने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रवेश मोफत असून निशुल्क प्रवेशासाठी सुलक्षणा टिळक (९३७२९०४१४६), अमोल खेर (९८२०२३३३४९), अमोल स्टेशनरी पनवेल येथे संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## धुळवड खेळून पोहायला गेलेल्या तरुणाचा बुडून मृत्यू

**कर्जत : बातमीदार**

कर्जतमधील घटना

कर्जत तालुक्यातील उल्हास नदीच्या डोहात बुडून एका तरुणाचा मृत्यू झाला. त्यामुळे धुलिवंदनच्या उत्साहाला गालबोट लागले.

कर्जत दहिवली भागात राहणारे काही तरुण शुक्रवारी (दि. १८) धुलिवंदन साजरा करून अंघोळ करण्यासाठी सांगावी-खांडपे येथील उल्हास नदीच्या डोहामध्ये दुपारी १ वाजता गेले होते. त्या १० जणांच्या ग्रुपमधील दोन तरुण करण धर्मसिंह आणि अक्षय विनोद डोडीया डोहात खोल पाण्यात बुडू लागले. हे दोघे बुडत असल्याचे लक्षात येताच त्यांच्यासोबत असलेल्या अन्य तरुणांनी आरडाओरड सुरू केली. त्यानंतर स्थानिकांनी त्यातील करण धर्मसिंह यास बाहेर काढले आणि कर्जत येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल केले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की तेथे पोहचल्या आणि त्यांनी खोपोली येथील अपघातग्रस्तांच्या टीमला पाचारण केले. तहसीलदार विक्रम देशमुख यांनीही खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांना अपघातग्रस्तांच्या टीमला पाठवण्याची सूचना केल्यानंतर बुडालेल्या तरुणाचा शोध घेण्यासाठी टीम सांगवी येथे पोहचली. तेथे तीन तासांच्या शोधमोहिमेनंतर अक्षय डोडीया या २० वर्षीय तरुणाचा मृतदेह बाहेर काढण्यात आला.



# रसायनी, चिरनेरमध्ये वणव्याचा भडका

## वनसंपदा जळून खाक; वनविभाग आणि निसर्गप्रेमींकडून आग आटोक्यात

**उरण, पनवेल : प्रतिनिधी**

रसायनी व चिरनेर परिसरातील डोंगरांवर वणवा पेटला होता. त्यात मोठ्या प्रमाणात वनसंपदा जळून खाक झाली. त्यामुळे निसर्गप्रेमींमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

चिरनेरच्या बापूजीदेव डोंगर परिसरात मंगळवारी (दि.१५) दुपारी दोन वाजताच्या सुमारास वणवा पेटला. दहा तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आटोक्यात आणली. गेल्या ३ दिवसांपासून लाडिवली डोंगर ते घेरावडी परिसर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले होते. मात्र फ्रेंड्स ऑफ नेचर आणि आपटा गुळसुंदे वनपरिक्षेत्राचे अधिकारी व कर्मचारी हा वणवा विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.



चिरनेर बापूजीदेव परिसरातील डोंगराला उन्हाचा पारा चढल्याने आग लागली. रणरणत्या उन्हाच्या तडाख्याने आग चांगलीच भडकली. या भडकलेल्या वणव्यात लाखो वन्यजीवांची हानी झाली आहे. वन कर्मचारी इंगोळे, पवार, शीतल आणि वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी, सदस्य काशिनाथ खारपाटील, महेश भोईर, मनोहर फुंडेकर, महेश मिरगे, राजेश पाटील आदींनी भडकलेला वणवा विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. मंगळवारी (दि.१५) दुपारी लागलेला वणवा तब्बल १० तासांच्या अथक प्रयत्नानंतर आटोक्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी यांनी दिली.

गेल्या तीन दिवसांपासून लाडिवली डोंगर ते घेरावडी परिसराला वणवा लागल्याचे लक्षात येताच फ्रेंड्स ऑफ नेचरचे प्रथमेश मोकल यांनी आपटा गुळसुंदे वनपरिक्षेत्राचे अधिकारी आडे यांना याबाबत माहिती दिली. घेरावाडी परिसरात आडे आपल्या वनकर्मचाऱ्यांसोबत काम करीत होते. तर फ्रेंड्स ऑफ नेचरचे प्रथमेश मोकल, नरेश मोरे व तुषार कांबळे शर्थीचे प्रयत्न करीत केले. वणव्याचे प्रकार वारंवार घडत असल्याने चिंता व्यक्त होत आहे.

### वणवा विझवण्यासाठी लोकसहभागाची गरज

***वणवा विझविणे हे केवळी वनखात्याचे काम नाही तर तेथील नागरिकांचे प्रथम कर्तव्य आहे. या वणव्यात अनेक प्राणी, पक्षांसह औषधी वनस्पतीही नष्ट होत आहेत. आपली जंगले म्हणजे आपली फुफ्फुसे आहेत. यामुळेच निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वनखात्यासोबत जाऊन वणवा विझवा, असे आवाहन फ्रेंड्स ऑफ नेचरतर्फे करण्यात आले आहे.***



# राजू शेट्टी महाविकास आघाडी सरकारवर नाराज

**मुंबई : प्रतिनिधी**



महाविकास आघाडी सरकारसमोरील अडचणी अजून वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे, कारण सरकारला पाठिंबा देणारा एक घटक पक्ष असलेल्या राजू शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना सरकारमधून बाहेर पडणार असल्याबाबत सूचक विधान केले आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना शेट्टींनी आपल्या पक्षाच्या पुढील वाटचालीविषयी धोरण स्पष्ट केले. त्यामुळे यानंतर राज्यात पुन्हा राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

राजू शेट्टी यांनी राज्य सरकारवर संवाद साधत नसल्याचा गंभीर आरोप केला आहे. या सरकारला अडीच वर्ष होत आली आहेत. महाविकास आघाडी सरकारचे समीक्षण करण्याची आता वेळ आली आहे. ज्या उद्देशाने 'किमान समान कार्यक्रमावर' ही महाविकास आघाडी अस्तित्वात आली त्या किमान समान कार्यक्रमाचे काय झाले? असा सवाल राजू शेट्टी यांनी उपस्थित केला आहे.

मी एकटा हा निर्णय घेऊ शकत नाही. महाविकास आघाडीमध्ये जाण्याचा निर्णय स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा सामुदायिक निर्णय होता. येत्या ५ एप्रिलला राज्य कार्यकारिणीची बैठक बोलावली आहे. त्यात चर्चा केल्यानंतर पुढचा निर्णय घेतला जाईल, अशा शब्दांत राजू शेट्टींनी सूचक इशारा दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडी सरकारपुढे अडचणींचा डोंगर येत असतानाच, आता राजू शेट्टी यांच्या वक्तव्यामुळे त्यात भर पडली आहे.

# कळंबोली लोह पोलाद बाजारातील गाळ्याला आग

## कागदपत्रांसह इलेक्ट्रिक वस्तू जळून खाक

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली लोह पोलाद बाजाराच्या इमारतीमधील गाळ्याला शॉर्टसर्किटमुळे आग लागली. तेथील कागदपत्रे त्याचबरोबर दोन संगणक, दोन प्रिंटर, दोन झेरॉक्स मशीन, सहा लॅपटॉप जळून खाक झाले. आग विझवण्यासाठी कळंबोली येथील अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी पोहोचले. मात्र आतमध्ये जाण्यासाठी जागा नसल्याने वेळेत आग विझवता आली नाही, अशी माहिती अग्निशमनच्या अधिकाऱ्यांनी दिली.

कळंबोली स्टील मार्केटमधील फॅसिलिटी सेंटर समोरील रस्ता बाजार समितीने बंद केला आहे. त्यामुळे या ठिकाणी वाहनांना ये-जा करता येत नाही. या ठिकाणी आग लागली असताना अग्निशमन बंबाला येथे येण्यासाठी अनेक अडथळे पार करावे लागले. या आगीत गाळ्यामधील कागदपत्रे त्याचबरोबर दोन संगणक, दोन प्रिंटर, दोन झेरॉक्स मशीन, सहा लॅपटॉप जळून खाक झाले.



### रस्ता बंद असल्याने घटनास्थळी पोहचण्यास अडचण

***आशिया खंडातील सर्वात मोठे लोह पोलाद मार्केट हे असून या ठिकाणी सिडकोने फॅसिलिटी सेंटर बांधले. या सेंटरच्या समोरील रस्ता सिमेंटचे ब्लॉक लावून गेल्या कित्येक महिन्यांपासून बंद करण्यात आला आहे. त्यामुळे अग्निशमन दलाचे बंब वेळेत त्याठिकाणी पोहण्यास अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागले.***



**उरण : होळी सण व धुलिवंदन तालुक्यात उत्साहात साजरे करण्यात आले. उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनीही त्यांच्या मित्रपरिवारासह धुलिवंदन उत्साहात साजरे केले.**

# कोल्हापूर उत्तर विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भाजप सज्ज –प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारबद्दल जनतेत प्रचंड नाराजी आहे. त्यामुळे भाजप कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात जनतेचा आदेश मिळवून पोटनिवडणूक जिंकेल, त्यासाठी आम्ही सज्ज आहोत असा आत्मविश्वास भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी (दि.१८) कोल्हापूर येथे व्यक्त केला.

ते म्हणाले की, या सरकारने केवळ मराठा समाजाचीच नव्हे तर ओबीसी, अनुसूचित जाती, धनगर अशा इतर समाजघटकांचीही फसवणूक केली आहे. एसटीच्या १०० कर्मचाऱ्यांच्या आत्महत्या झाल्या तरी या सरकारला पाझर फुटत नाही. शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडण्याचा निर्णय भाजपच्या दबावामुळे स्थगित करावा लागला. त्यामुळे या सरकारबद्दल समाजाच्या सर्व घटकांमध्ये नाराजी आहे. कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघासाठी भाजपने सत्यजित कदम आणि महेश जाधव अशा दोन नावांची केंद्रीय पार्लमेंटरी बोर्डाला शिफारस केली असून पक्षातर्फे कोणाला उमेदवारी द्यायची याचा निर्णय लवकरच होईल, अशी माहिती त्यांनी दिली.




# मिलिंद राणे यांचा गोवा येथे गौरव

**पनवेल : वार्ताहर**

आयएफडब्लू गोवा आणि आयएफसिटीद्वारे समर्थित, हिल्टन, गोवा येथे एशिया फॅशन अॅवॉर्ड्स २०२१-२२ चे आयोजन करण्यात आले होते. त्यात पनवेलचे क्रिएटिव्ह मीडिया हाऊसचे सिईओ तसेच अथर्व मीडिया वर्ल्डचे मिलिंद राणे यांना गौरविण्यात आले.

आयएफडब्लू गोवा आणि वाइल्ड ऑर्किड एंटरटेनमेंट्सचे संस्थापक आणि सीईओ, विल्यम झेवियर यांनी या शोचे आयोजन केले होते. एशियन फॅशन अॅवॉर्ड्स हा ज्यांनी त्यांच्या प्रतिभेने फॅशन जगतात आपले स्थान निर्माण केले आहे सन्मान करतो.

या वर्षी देण्यात येणाऱ्या पुरस्कारासाठी तीन हजारपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले होते. त्यात पनवेल येथील मिलिंद राणे यांना गौरविण्यात आले आहे.

पान १ वरून

# २४ जूनला एक लाख प्रकल्पग्रस्त रस्त्यावर उतरणार


त्यानंतर पोलिसांकडून अश्रुधूर. मग गोळीबार झाला आणि या ठिकाणी दोन हुतात्मे झाले. हीच ती भूमी आहे. सिडकोने आपले हुतात्मे केले. आपल्या लोकांना देवाघरी पाठवले, त्यांच्या कुटुंबांची बिकट अवस्था झाली. ३१ ते ३२ जणांना गोळ्या लागल्या. शेकडो लोकांवर लाठीमार झाला. आमच्या हातात काहीच शस्त्र नव्हते. शेवटी ध्येय्याने जो वेडा होतो त्या वेळी तो कशाची तमा बाळगत नाही. तशा प्रकारे समित्या काम करीत आहेत. समितीत कोण येतोय, नाही येत याचा विचार आम्ही करीत नाही, पण 'दिबां'च्या नावाला विरोध करू नका एवढेच आमचे त्यांना सांगणे आहे. प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांबाबत काही कमतरता असेल तर अवश्य सूचवा. आपल्याला प्रश्न सोडवायचे आहेत. आपापसात भांडण करून चालणार नाही. काही लोकांना करायचे असेल तर त्याला इलाज नाही.

१९८४ सालापासून साडेबारा टक्के भूखंडचा विषय झाला आणि त्याच्या निविदाही प्रसिद्ध झाल्या. लोकनेते दि. बा. पाटीलसाहेबांच्या हस्ते नारळ वाढवून भूखंड विकसित करण्याच्या कामाला सुरुवात झाली, मात्र अजूनसुद्धा प्रकल्पग्रस्तांना भूखंड मिळत नसतील तर कसे होणार, असा सवाल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित केला. राज्य सरकार अडाणी आहे. शिकलेली लोकं असतील त्यामध्ये भरपूर, पण विचारांच्या बाबतीत अडाणी आहेत. उगाच आडी मारायची अशा प्रकारची कामे करतात. म्हणून आठ आठ महिने वर्कऑर्डर देत नव्हते. सिडको-सरकारशी बोला, जेएनपीटी साडेबारा टक्के भूखंड प्रश्न मार्गी लावा, तरच हे १७ मार्चचे आंदोलन उग्र होणार नाही असे आमच्याशी चर्चा करायला आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना आम्ही सांगितले आणि तसे त्यांनी सिडकोला-शासनाला कळविले असेल. त्यामुळे सिडकोने आता ऑर्डर दिली व हा प्रश्न मार्गस्थ लागला तो 'दिबा'साहेबांच्या आशीर्वादामुळे आणि आंदोलनामुळेच हे शक्य झाले आहे. काल पी. पी. खारपाटील यांना वर्कऑर्डर घेण्यासाठी त्यांनी बोलावले. तीनचे साडेपाच वाजले मग त्यांनी सांगितले, नसेल द्यायची ऑर्डर तर सांगा आम्ही चाललो. त्या वेळी त्यांचा अभियंता मुंबईला होता. आता येतो, नंतर येतो चालले होते. त्या वेळी पुन्हा टोलवाटोलवी पाहता खारपाटील यांनी आम्ही चाललो. नसेल द्यायचे तर सांगा असा पुनरूच्चार केला. त्यांना माहिती होते आपण ऑर्डर नाही दिली, तर १७ मार्चचे आंदोलन उग्र होईल. हे लक्षात घेऊन त्या वेळी संबंधित दुसऱ्या अधिकाऱ्याने वर्कऑर्डरवर सही केली. सिडकोला आपली नोंद घ्यावी लागत आहे हा आपल्या प्रकल्पग्रस्तांचा मोठा विजय आहे. यापुढील काळातही विजय परंपरा कायम ठेवायची आहे. लढाई जिंकूया, अशी सादही त्यांनी घातली.

आमदार महेश बालदी म्हणाले की, राज्य सरकार संधीची वाट बघतेय, पण ती संधी आंदोलनाच्या रेट्यापुढे मिळालेली नाही हे या लढ्याचे यश आहे. सिडकोकडे प्रकल्पग्रस्तांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. हे प्रश्न सुटले पाहिजेत, न्याय मिळाला पाहिजे यासाठी सिडकोचा वर्धापन दिन काळा दिन पाळून आपण रास्ता रोको आंदोलन केले. सिडकोकडे जेएनपीटीच्या प्रलंबित साडेबारा टक्के भूखंडाचे टेंडर गेल्या २३ ऑगस्टला जाहीर केले होते. आठ महिने त्यांनी वर्कऑर्डर थांबवलेली. नाकर्त्या सरकारच्या नाकावर टिचून या आंदोलनाचा रेटा आणि धसका घेऊन सिडकोने ती वर्कऑर्डर ठेकेदाराला दिली. आम्हाला ठेकेदारांचे कौतुक नाही, पण साडेबारा टक्केच्या ५० वर्षांपासून प्रलंबित सिडकोचे नसलेले पण जेएनपीटीने देऊ केलेले साडेबारा टक्क्यांचे प्लॉट मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आणि त्याची डेव्हलपमेंट सुरू होईल तो आजच्या आंदोलनाच्या आनंदाचा भाग आहे. परवा झालेल्या सिडको एमडींसोबतच्या बैठकीत सर्व कमिटीकडे २७ गावचे प्रश्न, विमानतळबाधितांचे प्रश्न असतील मग त्यामध्ये सीसी, ओसीचा प्रश्न असेल, त्यानंतर १८ महिन्यानंतरच्या घरभाड्याचा प्रश्न, आर आर पॉकेटमध्ये राहिलेली डेव्हलपमेंट असेल या सर्व कामांची कमिटमेंट सिडको एमडींकडून समितीने घेतली हा आनंदाचा क्षण आहे की अशा आंदोलनापुढेच सिडको झुकली आणि त्यांनी आपल्या मागण्या मान्य केल्या. नंदराजजी काळजी करू नका. १८ महिन्यानंतरच्या देण्याचे भाडेही मिळवून घेऊ. विस्थापनानंतर एअरपोर्ट ऑथॉरिटीमुळे ओसी सीसी मिळण्यास उशीर होत असेल, तर त्याच्याकरिता उर्वरित महिन्यांचे भाडे सिडकोनेच द्यायला पाहिजे हासुद्धा आपल्या आंदोलनाचा भाग आहे. कालच लोकनेते गणेश नाईक यांनी २५० मिटरचा गावठाण विस्तार सरकारने केला तो कसा चूक आहे आणि त्याच्याकरिता काय काय बरोबर केले पाहिजे हे विस्तृतपणे विधानसभेत मांडले. त्याकरिता मी गणेश नाईक यांचे अभिनंदन करतो. अनेक ठिकाणची भौगोलिक परिस्थिती वेगवेगळी आहे. एका बाजूला २५० मीटरची असेल, कुठल्या परिघामध्ये असेल, नाला असेल, नदी असेल, खाडी असेल, तर त्याची २५० मीटर उपयोगाची नाही. त्यामुळे दुसरीकडची ५०० मीटरची करायला पाहिजे या सर्व गोष्टींची विस्तृत चर्चा समितीने परवा सिडको केलेली आहे.

होळीचा सण असतानाही आजचा रास्ता रोको तळतळत्या उन्हात होत आहे. तुमचे आणि आमचे एकच धेय्य आहे 'दिबा'साहेबांचे नाव विमानतळाला आणि प्रकल्पग्रस्तांचे सर्व प्रश्न मार्गी लागलेच पाहिजेत. त्यासाठी प्रकल्पग्रस्त आणि लोकप्रतिनिधी आपण एक राहिलो, तर सिडकोच्या बापालाही सर्व कामे करायला भाग पाडू. ही एकजूट आपण कायम ठेवत यापुढेही जेव्हा जेव्हा आंदोलनाची हाक येईल तेव्हा तेव्हा प्रतिसाद द्याल, अशी अपेक्षाही आमदार महेश बालदी यांनी खात्रीने व्यक्त केली.

आपला लढा चालू आहे. ज्या जमिनीवर विमानतळ उभे राहत आहे त्या विमानतळाला आमच्या बापाचे नाव म्हणजेच दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव दिलेच पाहिजे. कितीही दिवस लढा चालू राहू दे. सर्व मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार आहे आणि ती प्रतिज्ञा आपण सर्वांनी घेतली आहे, असे कॉ. भूषण पाटील यांनी म्हटले.


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
शनिवार, दि. १९ मार्च २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर

कोव्हॅक्सिन

- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+ ते १५+)
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
- १०. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
- ११. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ ते १८+)
- १२. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ ते १८+)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

# विविध उपक्रमांनी होलिकोत्सव साजरा

## तक्का गावातील पारंपरिक होळी ठरली आकर्षण

**पनवेल : परिसरात अनेक ठिकाणी पारंपरिक पद्धतीने त्याचप्रमाणे विविध सामाजिक उपक्रम राबवून होळीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्रात फाल्गुन पौर्णिमेपासून ते फाल्गुन वद्य पंचमीपर्यंत दोन ते पाच दिवस होळी साजरी करण्यात येते. तक्का गावातील होळी इतर ठिकाणच्या होळीपेक्षा आगळ्या-वेगळ्या पद्धतीने रचली जाते. ही होळी दरवर्षीच परिसरात आकर्षणाचा विषय ठरते.**

तक्का गावातील होळी इतर ठिकाणच्या होळींपेक्षा आगळ्या-वेगळ्या पद्धतीने रचली जाते. या ठिकाणी होळी एखाद्या छोट्या झोपडीसारखी असते. होळीच्या आतमध्ये बसून तिची पूजा केली जाते.

होळीच्या मध्यभागी उंच झाड उभे केले जाते. त्याच्यावर मासे व खेकड्यांचे चित्र कापून त्यांच्या पताका लावल्या जातात. रात्री होळी लावण्यापूर्वी काही वेळ आधी या झोपडीत लाकडे रचून ती बंद केली जाते. त्यानंतर होळी लावण्यात येते. ही प्रथा अनेक वर्षे सुरू असल्याचे ग्रामस्थ सांगतात.





### रोटरी क्लबतर्फे विविध उपक्रम

रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर आणि डॉ. एनएमजे दिव्यांग शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेमध्ये एक आगळीवेगळी होळी साजरी करण्यात आली. या वेळी रोटरी क्लबचे अलका कोळी तोडणकर, पुरनसिंग मेहरा, स्नेहल पेंडसे तसेच शाळेतील मुख्यधापाक, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठया संख्येने उपस्थित होते. तसेच रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर व पर्यावरण दक्षता मंडळ यांच्या वतीने नवीन पनवेल येथील शाळेमध्ये जाऊन कृत्रिम पद्धतीने रंग कसे तयार करावे, याचे प्रशिक्षण मुलांना व पालकांना देण्यात आले. त्याचप्रमाणे महिलाना स्वयंरोजगार म्हणून अलका कोळी यांनी गोधडी प्रशिक्षण दिले व घरात बसून महिलांनी दिवा किंवा समईतील वात कशी बनवावी याचे प्रशिक्षण स्नेहल पेंडसे यांनी दिले. या उपक्रमास पुरनसिंग मेहरा, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





### 'एक पोळी होळीची, भुकेलेल्या मुखाची'

कामोठ्यातील यशस्विनी सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक महिला मंडळातर्फे भानघर येथील करुणेश्वर वृद्धाश्रमात जाऊन पुरणपोळ्यांचे तसेच शिधा, बिस्किट व मास्कवाटपही करण्यात आले. या वेळी 'यशस्विनी'च्या संस्थापक अध्यक्ष पल्लवी हर्षवर्धन पाटील, सचिव कल्पना जाधव, खजिनदार सुनीता शर्मा उपस्थित होत्या.



### 'संकल्प'मुळे लहानग्यांच्या चेहऱ्यावर हसू



होळी सणासाठी सर्वच ठिकणी नैवेद्य म्हणून पुरणपोळी अर्पण करण्याची प्रथा आहे, परंतु ही पुरणपोळी होळीमध्ये अर्पण न करता ती एखाद्या गरजू व्यक्तीला दिल्यास त्यांचे आशीर्वाद तर आपल्याला लाभतातच, शिवाय मानसिक समाधानही मिळते. याच उदात्त हेतूने कामोठे करंजाडे येथील संकल्प फाउंडेशनतर्फे गुरुवारी (दि. १७) ओपन एज्युकेशनमधील मुलांना पुरणपोळी व कुरडई, करंजी, अनारशांचे वाटप केले. या वेळी अध्यक्ष वैशाली जगदाळे, कुंडेवहाळ गावातील सरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.


**उरण नगरपरिषद, उरण**

**निविदा सूचना**

जा.क्र.उनप/आरोग्य/४१४०/२०२१-२२
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड
दिनांक :- १७/०३/२०२२

उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील कामांकरिता अनुभवी ठेकेदाराकडून दोन सिलबंद निविदा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषद हद्दीतील जे. एम. म्हात्रे न्यू इंग्लिश स्कूल मोरा येथील मैदान तसेच शाळेच्या आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता करणे. | २०००/- | ५००/- |
| २. | उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील स्वच्छ सर्वेक्षण २०२२ अंतर्गत उरण ते बोरी येथील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयाचे दरवाजे व खिडक्या बसविणे. | २०००/- | ५००/- |
| ३. | उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील स्वच्छ सर्वेक्षण २०२२ अंतर्गत बोरी ते मोरा येथील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयाचे दरवाजे व खिडक्या बसविणे. | २०००/- | ५००/- |
| ४. | उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील बोरी ते मोरा येथील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयातील युरीनल पॉट, कडप्पे, आरसे, बेसीन, व इतर किरकोळ दुरुस्ती करणे. | २०००/- | ५००/- |
| ५. | उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील उरण ते बोरी येथील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयातील युरीनल पॉट, कडप्पे, आरसे, बेसीन, व इतर किरकोळ दुरुस्ती करणे. | २०००/- | ५००/- |
| ६. | उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील निर्माण होणारा झाडपाला कचरा नगरपालिका परिसरात साठविणेत आलेला आहे. तरी त्याची डंपर व मनुष्यबळाच्या सहाय्याने वाहतूक करणेकामी ठेकेदार नियुक्त करणे. | २०००/- | ५००/- |

**अटी/शर्ती :-**

१. कोऱ्या निविदा फॉर्मचे नमुने निविदा शुल्क (ना परतावा) नगरपरिषदेच्या लेखा विभागात कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस दिनांक २१/०३/२०२२ ते दिनांक २९/०३/२०२२ रोजीपर्यंत रोखीने भरल्यास आरोग्य विभागात सकाळी १०.०० ते सायं. ०५.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
२. इसारा अनामत दिनांक २१/०३/२०२२ ते दिनांक २९/०३/२०२२ रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत लेखा विभागात स्विकारली जाईल.
३. सिलबंद निविदा/दरपत्रके दोन लखोटे पद्धतीने कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत आवक/जावक विभागात स्विकारण्याची अंतिम दिनांक ३०/०३/२०२२ रोजीचे दुपारी ४:०० वाजेपर्यंत असेल. तसेच मुदतीनंतर आलेल्या निविदा/दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत किंवा याबाबत कोणतीही कारणे दिली जाणार नाहीत.
४. निविदा सादर करतेवेळी लखोटा क्र. १ मध्ये इसारा अनामत रोखीने भरलेली मूळ पावती, अनुभवाचे दाखले/नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. लखोटा क्र. २ मध्ये उरण नगरपरिषदेने विहित नमुन्यात तयार केलेल्या निविदा फॉर्ममध्ये खाडाखोड न केलेले भरलेले दरपत्रक सादर करणेचे आहे.
५. सिलबंद निविदा/दरपत्रके विहित कालावधीत समक्ष सादर करावयाची आहेत. त्या पोष्टाने पाठविल्यास उरण नगरपरिषद त्यांचा स्वीकार करणार नाही. किंवा त्याबाबत कोणतेही कारण देण्यात येणार नाही.
६. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या वैध निविदा शक्यतो निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनी सायं. ५:०० वाजता किंवा शक्य न झाल्यास लगतच्या दुसऱ्या दिवशी पुरवठादार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष मे. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या दालनात उघडणेत येईल.
७. कोणतेही निविदा/दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा/दरपत्रके नाकारण्याचा सर्व अधिकार नगरपरिषदेचे असतील. तसेच कोणतेही कारण न देता निविदा/दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार नगरपरिषदेस असेल.

**सही/-**
**(संतोष माळी)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**



**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Estimated cost |
|---|---|---|
| Tend-36 7000022365 Re-tender | Work Supply and replacement of existing CT cable by 4CX2.5 sq.mm Cu arm cables at 400kV R.S. Nagothane S/Stn.. | Rs. 66.48 Lakhs |

EMD 1% of estimated cost & Tender fee Rs.500/- + GST. **Submission of bids from 17.03.2022 to 24.03.2022 up to 23:59 hrs, Opening date:- 25.03.2022.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm.)
Mob. No. 9167026141

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**





**MAHAVITARAN**

**TENDER NOTICE**

Following Tender is invited from Eligible Bidders under Pen Circle Raigad District. The Details are as given below- (PRO No-26)

| Sr. No. | Tender No. | Particulars | Sale Opening, Sale Closing Dates & Bid Submission | Estimated Cost (Rs.) | Amount of EMD (Rs.) | Tender Cost Fee Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | SE/PC/ Vehicle/ T-9/2021-22 | Tender For Hiring of 4 nos of vehicle(Tata sumo or equivalent) for Executive Engineer, Batch A, Batch B & Batch C of Testing Div., Pen under Pen Circle for period of two years. | Dt.18/03/2021 To Dt.26/3/2021 Bid Submission Date: 26/03/2021 upto15:00 hrs. | Rs. 39,36,000/- | Rs- 39360/- | Rs. 1180/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website **http://works.mahadiscom.in/eTender/etender**. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Executive Engineer (Adm.) Tel No. 02143 - 252099 / 257704, Mobile No.7875762777.

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER (PC), PEN**


### आवरे येथील तलाव सुशोभिकरणाचे भूमिपूजन

**उरण : बातमीदार**

आमदार महेश बालदी यांच्या जिल्हा नियोजन निधीतून आवरे येथील तलाव सुशोभिकरण कामाचे भूमिपूजन भाजप उरण तालुकाध्यक्ष रविशेठ भोईर व आवरे सरपंच निराबाई पाटील यांच्या हस्ते झाले.

या वेळी महिला तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, पूर्व विभाग प्रमुख शशिकांत पाटील, संतोष वर्तक, खोपटे ग्रामपंचायत सदस्य अच्युत ठाकूर, संदेश भाई पुनाडे, मच्छिंद्र वर्तक-गोवठणे, प्रा. प्रमोद म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य चेतन पाटील, ग्रामपंचायत सदस्य स्वाती गावंड, गावअध्यक्ष बाळा गावंड, आवरे ग्रामपंचायत सदस्य अनिल गावंड, पाले गावअध्यक्ष अमित म्हात्रे, सुनील पाटील, निर्णय पाटील तसेच विभागातील भाजपचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



**शुभेच्छा...!**

**पनवेल : भाजपचे पोयंजे विभागीय पंचायत समिती अध्यक्ष प्रवीण ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त उरणचे आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी सोबत होते.**


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | E-Tender-07/22-23 / Rfx No.7000022686 | Providing 21 No of semiskilled labour (ITI certified Technicians in Electrical / Wireman trade) for field work under 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane for the financial year 2022-23 | Rs. 53,91,699/- | 24.03.2022 up to 23.59hrs |
| 2 | E-Tender-08/22-23 / Rfx No.7000022687 | Work of providing semi-skilled labour (LDC cum Computer Operator – 2 no.) & unskilled labour (Peon – 1 no.) at 400kV R.S. (O&M) Dn., Nagothane for the financial year 2022-23 | Rs. 7,46,567/- | 24.03.2022 up to 23.59hrs |

EMD fee 1 % of estimated cost & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmtender.mahatransco.in/ Contact Person:** MITESH GOYAL Mob No. 9461456635
Email ID : ee7230@mahatransco.in
**Note:** All eligible suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL

**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**



**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022646** **Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-2/2022-2023** RFx E-tender for hiring of vehicle at EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023 under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**



**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022648** **Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-4/2022-2023** RFx E-tender for hiring of vehicle at 220kV Taloja substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023. **Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**



**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022647** **Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-3/2022-2023** RFx E-tender for hiring of vehicle at 220kV ONGC substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023. **Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

## संपादकीय

# कोरोनाचा पुन्हा धोका?

कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा संसर्ग ओसरल्यानंतर सर्वांना दिलासा मिळाला असतानाच आता पुन्हा एकदा कोविड विषाणूने उगमस्थान असलेल्या चीन तसेच अन्य देशांमध्ये डोके वर काढले आहे. दक्षिण कोरियातही कोरोनाने हाहाकार माजवला असून अनेक ठिकाणी परत लॉकडाऊनची वेळ आली आहे. अशातच जागतिक आरोग्य संघटनेने धोक्याचा इशारा दिला आहे.

**गेली दोन वर्षे पाठशिवणीचा खेळ खेळणारा कोरोना पुन्हा एकदा नवा अवतार घेऊन आला आहे. डेल्टा आणि ओमायक्रॉन या दोघांपासून डेल्टाक्रॉन या नव्या व्हेरिएंटची निर्मिती झाली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या माहितीनुसार काही युरोपीय देश फ्रान्स, नेदरलँड्स आणि डेन्मार्कमध्ये या नव्या डेल्टाक्रॉन व्हेरियंटची लागण झाल्याचे निष्पन्न झाले आहे. हा व्हेरिएंट सहजपणे फैलावतो, शिवाय याची लागण झाल्यानंतर एक व्यक्ती, एकाच वेळी दोन व्हेरिएंटने संक्रमित होऊ शकते असेही म्हटले जात आहे. अद्याप यावर संशोधन सुरू असल्याने इतक्यात निष्कर्ष व अनुमान काढता येणार नाही, पण कोरोनाने काही देशांमध्ये धुमाकूळ घातलाय हे मात्र नक्की. गेल्या दोन वर्षांपासून कोरोनाने मानवाचे जीणे हराम केले आहे. सर्वप्रथम २०२० मध्ये उत्पत्ती झालेल्या कोरोनाने बघता बघता संपूर्ण जग आपल्या कवेत घेतले आणि होत्याचे नव्हते केले. मग दुसरी लाट आली. तिने तर कहरच केला. स्वाभाविकपणे आपल्या देशालाही याची झळ बसली, परंतु इतर बलाढ्य देशांच्या तुलनेत आपल्याला कमी फटका बसला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात झालेल्या लसीकरणामुळे तिसरी लाट थोपवण्यात आपल्याला यश आले. यानंतर सर्व व्यवहार सुरळीत होऊन जीवन पूर्वपदावर आलेले असताना चीन तसेच इतर देशांत कोरोना रुग्णांची संख्या वाढू लागल्यामुळे जागतिक आरोग्य संघटनेने चिंता व्यक्त केली आहे. आता जे आकडे समोर येत आहेत ते केवळ हिमनगाचे टोक आहे, असे जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे. अर्थात, याआधीही कोरोनाचा वारंवार संसर्ग झालेला असून नवनव्या व्हेरिएंटने धडकी भरविली होती. प्रत्यक्षात मात्र काही व्हेरिएंटचा प्रभाव तेवढा जाणवला नव्हता जेवढी भीती निर्माण केली गेली होती. असे असले तरी पूर्वानुभव बघता कोरोनाला कुणालाही हलक्यात घेता येणार नाही. कोरोनाविषयक नियमांचे पालन जसे की मास्क बांधणे, सामाजिक अंतर राखणे, सॅनिटायझरचा वापर करणे या गोष्टी आपल्याला पाळाव्याच लागणार आहेत. आपण बघतो की कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्यावर नियमांचे काटेकोर पालन केले जाते. याउलट कोरोना रुग्णांची संख्या घटू लागली की मात्र नियम सर्रास पायदळी तुडविले जातात. हे योग्य नाही. बेफिकीरपणा, अतिउत्साह, नसते धाडस कुठल्याही संकटास कारणीभूत ठरतात. इथे तर कोरोनारूपी शत्रू साध्या डोळ्यांना न दिसणारा आणि वेगाने पसरवणारा संसर्गजन्य आहे. त्यामुळे त्याचे इतक्यात उच्चाटन होणार नाही असे दिसते, परंतु सतर्क राहून, योग्य काळजी घेऊन आपण त्याला बऱ्याच अंशी थोपवू शकतो. आपण ते याआधी करूनही दाखविले आहे. अशाच प्रकारे भविष्यातदेखील आपल्याला स्वत:सह कुटुंबाच्या तसेच समाजाच्या पर्यायाने देशाच्या व जगाच्या सुरक्षेसाठी सावध पावले टाकून मार्गक्रमण करायचे आहे. म्हणजे सर्वांचाच प्रवास सुकर होईल. तेव्हा नियम पाळा आणि संसर्ग टाळा!**

# आंबा बागायतदार संकटात

खबरबात
धम्मशील सावंत

आंबा हा फळांचा राजा आहे, हे जगमान्य झाले असून सद्यस्थितीत आंबा हे एक सर्वत्र महत्त्वाचे पैसे मिळवून देणारे फळपीक झालेले आहे. कोकणातील हापूस चवीसाठी जगभर प्रसिद्ध आहे. मात्र यंदा हापुसची गोडी महागणार असल्याचे चित्र दिसून येतेय. बदलते हवामान, ऊष्मा व अवकाळी पावसाचा जबर फटका आंबा उत्पादकांना बसला आहे. यंदा हापूस आंबा चाखायला तरी मिळेल की, नाही ही धास्ती शेतकऱ्यांना सतावतेय.

आंबा पिकाखालील क्षेत्र आणि उत्पादनात भारतात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो. महाराष्ट्रात आंब्याचे क्षेत्र तीन लाख ५७ हजार २९० हेक्टर आहे. कोकण विभागातील हापूस आंबा मोठ्या प्रमाणात निर्यात होत असून त्यापासून शेतकऱ्यांना चांगल्याप्रकारे पैसा मिळत आहे. हापूस आंब्यापाठोपाठ इतर विभागातील केशर आंबाही मोठ्या प्रमाणात निर्यात होण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे आंब्यापासून आपल्याला परकीय चलन मोठ्या प्रमाणात मिळत आहे. परंतु, दरवर्षी कोणत्या ना कोणत्या कारणाने आंबा मोहोराचे पर्यायाने फळांचे मोठे नुकसान होतांना दिसून येते. रायगड जिल्ह्यात सुमारे ५६ ते ६० हजार आंबा बाग़ायतदार आहेत. तर कोकणात सुमारे साडेचार लाख आंबा बाग़ायतदार असल्याची माहिती मिळते.

१ व २ डिसेंबर २०२१ रोजी अवकाळी पाऊस झाला. तसेच ऊष्मादेखील वाढला आहे. त्यामुळे आंब्याला खास करून कोकणातील हापूस आंब्याला पहिल्या टप्प्यात आलेला मोहोर खडला. मावा व तुडतुड्याचा आंब्यावर मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला. आंबा उत्पादकांनी महागडी कीटकनाशके, पेस्टीसाईडस् व बुरशी नाशके यांचा वापर करून प्रचंड मेहनत केली. त्यामुळे मोहर धरला खरा मात्र मोहरात नर फुलांचे प्रमाण अधिक असल्यामुळे फळधारणा झाली नाही. त्यामुळे या वर्षीचा हंगाम गतवर्षीपेक्षा वाईट झाला आहे. जेमतेम १० ते १५ टक्के उत्पन्न मिळणार असल्याची चिंता शेतकरी वर्गाला सतावत आहे. मोहर टिकविण्यासाठी पुन्हा मोठ्या प्रमाणात औषधांचा खर्च वाढला. सध्या नेहमीच आभ्राच्छादीत व विचित्र हवामान असते त्यामुळे फेब्रुवारीला संपणाऱ्या फवारण्या मार्चपर्यंत आणि पुढेदेखील लांबल्या आहेत. वाईट हवामानामुळे वाटाण्याएवढे आंबेदेखील धरले जात नाहीत, अशी परिस्थिती दिसून येत आहे.



अनेक धार्मिक विधीत याची आंब्याची पाने, मोहोर व फळे पवित्र व आवश्यक मानतात. कच्ची फळे (कैऱ्या) लोणची, मुरंबे व पन्हे यांकरिता आणि पक्की फळे खाण्यास व मिठाईकरिता उपयुक्त असतात. खोडाच्या सालीतील टॅनिनामुळे ती कातडी कमावण्यास आणि रेशीम, सूत व लोकर रंगविण्यात वापरतात. आब्याच्या झाडाचे लाकूड बांधकाम, शेतीची अवजारे, खोकी इत्यादींकरिता उपयोगी पडते. पक्व फळ सारक, गर्भाशयातून किंवा फुप्फुसातून होणाऱ्या रक्तस्रावावर उपयुक्त असते. बिया दम्यावर, फळाची साल स्तंभक (आकुंचन करणारी) उत्तेजक व शक्तिवर्धक आहे. गुरे पाला आणि फळांच्या साली खातात.

महाराष्ट्रातील आंबा लागवडीखालील क्षेत्र प्रत्येक वर्षी वाढत आहे. राज्यात अनेक भागात आंब्याच्या केशर, लंगडा, पायरी, हापूस, रत्ना अशा अनेकविध वाणांची शेतकरी बांधवांनी लागवड यशस्वी केलेली निर्दर्शनास येते. आंब्याची फुले (मोहोर) १० ते ४० सेंटीमीटर लांबीच्या गुच्छामध्ये येतात. प्रत्येक फुलाला पाच पाकळ्या असून त्यांची लांबी साधारणपणे ५ ते १० मिलीमीटर एवढी असते. त्याला एक प्रकारचा मंद सुवास असतो. जर पाऊस नोव्हेंबरमध्येही पडत राहिला आणि थंडी पडायला उशीर झाला तर मोहोर येण्याची प्रक्रिया रखडते.

आंब्याच्या उत्पादनात मोहोर संरक्षणाला विशेष महत्त्व आहे. प्रमुख व दुय्यम पोषण द्रव्यांची कमतरता, संजिवकांचा आभाव, पाण्याचे अयोग्य व्यवस्थापन आणि कीड – रोगांचा प्रादुर्भाव या सारख्या कारणांमुळे मोहोर आणि फळगळती होते. आलेल्या मोहोराचे चांगल्या प्रकारे संरक्षण करून जास्तीत जास्त फळधारणा कशी होईल यावर लक्ष केंद्रित करावे लागते.

आंब्याची उत्पादकता ही मोहोरावरील कीड व रोगापासूनचे संरक्षण या बाबीवर अवलंबून आहे. त्यामुळे आबा मोहोराचे संरक्षण करणे तितकेच महत्त्वाचे आहे . आंब्याच्या मोहोरावर प्रामुख्याने तुडतुडे, फुलकिडे , मीजमाशी, शेंडा पोखरणारी अळी इत्यादी किडींचा आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव होऊन मोहोराचे अतोनात नुकसान होत असते. म्हणूनच याकिडींचा आणि भुरी रोगाचा बंदोबस्त करून मोहोराचे संरक्षण करणे गरजेचे आहे.

**रायगड जिल्ह्यात आंबा बागांचे क्षेत्र १४ हजार हेक्टर आहे. उत्पादनक्षम आंबा बागा या १२५४० हेक्टर क्षेत्रावर आहेत. मागील दोन वर्षात निसर्ग व तौक्ते चक्रीवादळाने आंबा बागायती क्षेत्राचे मोठे नुकसान झाले. ज्या फळबागा क्षेत्रांचे नुकसान झाले त्या क्षेत्रात फळबाग पुनर्लागवड व पुनर्जीवित करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. आजतागायत ४१२३ शेतकऱ्यांना १३ कोटी रक्कम वितरित केलेली आहे. अजूनही २२३६४ शेतकऱ्यांना जवळपास २७ कोटींचा निधी वितरित करणार आहोत. सदर निधी मंजुरीकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.**
**–दत्तात्रेय काळभोर,**
**उपसंचालक, कृषी विभाग**
**अलिबाग रायगड.**

**पाच वर्षांपूर्वी कोकणात तीन लाख हेक्टरवर हापूस आंब्याची लागवड होती. मात्र आता हवामान बदलाने अनेक संकटे आंब्यावर आलीत. खर्चदेखील वाढला आहे. वित्तीय संस्था, बँका कर्ज देतात मात्र त्याची परतफेड कशी करणार हा प्रश्न आहे. फेब्रुवारीमध्ये येणारा आंबा मार्चमध्ये बाजारात गेला. कर्नाटक व आंध्र च्या आंब्याने हापुसवर आक्रमण केले आहे. हापूस विक्रीसाठी एपीएमसीमधील दलालांनीदेखिल सुळसुळाट केला आहे. ते शेतकऱ्यांची फसवणूक करतात. शासनाने याकडे गांभिर्याने लक्ष दिले पाहिजे. उत्पादन वाढीसाठी शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे.**
**–चंद्रकांत मोकल, अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघ**

यावर्षी हवामान बदल होत प्रत्येक महिन्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. २ डिसेंबर रोजीच्या पावसाने आंबा बागायतदारांचे कंबरडे मोडले. ३० तास सलग पाऊस व हवा यामुळे आंबा मोहर गळून पडला, तसेच पाण्याची पातळी वाढल्याने आंबा मोहर येण्याची प्रक्रिया मंदावली. डिसेंबर महिना आंबा बागायतदार यांच्यासाठी निराशाजनक गेला.

अगोदर जो मोहर आला त्याचे बुरशी व बुरशीजन्य रोगांनी नुकसान झाले. जानेवारीमध्ये आलेला मोहोराने अगोदरचे आंबे पाडून टाकले. आंबा काढण्याचा हंगाम जूनपर्यंत चालेल मात्र जूनमध्ये पाऊस पडला तर आंबा पिकांचे मोठे नुकसान होणार आहे. फवारणी व इतर खर्च वाढला आहे. हा परवडणारा नाही, असे जांभूळपाडा (ता. सुधागड) येथील आंबा बागायतदार संदेश पाटील यांनी सांगितले.

बदलत्या हवामानाचा आंबा पिकाला मोठा फटका बसतोय. चार वेळा मोहोर आलाय. मात्र तो सतत गळून पडतोय. फवारणी व इतर खर्च न परवडणारे आहे. बँकाकडून घेतलेले कर्ज फेडता येत नाही. ही परिस्थिती अशीच राहिली तर कोकणातील शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ येईल. मायबाप सरकारने मदतीचा हात द्यावा, असे आंबा बागायतदार शेतकरी चंद्रकांत पाटील (कार्ले खिंड, ता. अलिबाग) म्हणाले.

बदलत्या हवामानाचा गंभीर परिणाम आंबा उत्पादनावर होत असल्याने सरकारने योग्य ती पावले उचलून शेतकरी व बाग़ायतदार यांना भक्कमपने उभे राहण्यासाठी आर्थिक मदत व सहकार्य करण्याची अपेक्षा व्यक्त होतेय.

# डॉ. बावस्करांचा पुरस्कार हा कोकणचा सन्मान

## ■ विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांचे गौरवोद्गार

**महाड : प्रतिनिधी**

विंचूदंशावर संशोधन करून समाजाला मोठ्या संकटातून वाचविणाऱ्या डॉ. हिंमतराव बावस्कर यांना मिळालेला पद्मश्री पुरस्कार हा कोकणाचा सन्मान आहे तसेच हा पुरस्कार दिल्याबद्दल केंद्र सरकारचे आणि शिफारस केल्याबद्दल राज्य सरकारचे धन्यवाद विधान परिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केले.

खांदेशचे सुपुत्र डॉ. हिंमतराव बावस्कर यांनी कोकणात येऊन विंचूदंशाने मरणाऱ्या गोरगरिबांसाठी संशोधन करुन मोठे कार्य केले. या त्यांच्या कार्याची दखल घेऊन राज्य सरकारने केंद्राकडे शिफारस करुन त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. शुक्रवारी (दि. १८) विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार केला. या वेळी जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, उपजिल्हाध्यक्ष अक्षय ताडफळे, महिला उपजिल्हाध्यक्षा डॉ. मंजुशा कुद्रीमोती, बेटी बचाव बेटी पठाव सेलच्या अध्यक्ष निलीमा भोसले, सरचिटणीस महेश शिंदे, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर, संदिप ठोंबरे, तुषार महाजन, श्रध्दा भोसले, नमिता दोशी, मनोज धामनसे आदी उपस्थित होते.

दरम्यान, बोलताना दरेकर यांनी महाड उपजिल्हा रुग्णालयाची मागणी करणारीत थेट आरोग्यमंत्री राजेश टोपे यांना तातडीने संपर्क केला. या वेळी सर्व प्रकारची साधने महाड ग्रामीण रुग्णालयाला पुरवणार आणि मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार उपजिल्हा रुग्णालय करण्याचे आश्वासन त्यांनी दरेकरांना दिले. महाडकरांनी पाठपुरावा करावा, असे दरेकर म्हणाले तसेच अधिवेशनात ग्रामीण भागातील शासकीय डॉक्टरांना पगारवाढ देण्याबाबत मागणी करणार असल्याचे दरेकर म्हणाले.



# कशेडी घाटातील टेम्पोच्या धडकेत एक जण ठार, तिघे जखमी



**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटात शुक्रवारी (दि. १८) पहाटे चहा पिण्यासाठी थांबलेल्या प्रवाशांना भरधाव टेम्पोने धडक दिल्याने एकाचा मृत्यू झाला तर अन्य तिघे जखमी झाले आहेत. या अपघातप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एका कारमधील (एमएच ४८ बीटी १८१७) दोन जण आणि दोघे दुचाकीस्वार (एमएच ०८ टी ३६६६) आपली वाहने थांबवून कशेडी बंगला येथे चहा पित उभे होते. त्या वेळी मुंबई ते संगमेश्वरला चाललेल्या एका टेम्पोच्या (एमएच ०८ एटी ९२११) चालकाचा वाहनावरील ताबा सुटून त्याने टपरीवर चहा पीत असलेल्या या चौघांना धडक दिली. या अपघातात विनीत मधुकर राऊळ (वय ३७, रा. विरार) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर जयेश रमेश राऊत, अशोक तुळशीराम पांगले (मुंबई) आणि अशोक यशवंत राऊत (रा. कसबा ता. संगमेश्वर) जखमी झाले असून यातील काहींना किरकोळ जखमा असल्याने उपचारानंतर सोडून देण्यात आले आहे. या अपघाताला कारणीभूत असलेला टेम्पोचालक महम्मद यासीन उमर फारुख पठाण (वय २५, रा. संगमेश्वर) याच्यावर पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खालापुरात ट्रेलरच्या धडकेत लहानग्याचा मृत्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

सायकलवरून जाणाऱ्या आठ वर्षीय मुलाला भरधाव ट्रेलरची धडक बसून त्याचा मृत्यू झाल्याची घटना खोपोली–पाली मार्गावर उंबरे गावानजीक घडली आहे. ट्रेलर चालक पंचानंद नथूनी शहा (रा. डोलवी, वडखळ, पेण) याला अटक करण्यात आली आहे.

ट्रेलरचालक शहा हा ट्रेलर घेऊन गुरुवारी (दि. १७) खोपोली–पाली मार्गावरून भरधाव वेगात जात होता. त्याच वेळी उंबरे गावच्या हद्दीत पार्थ नितीन मुसळे (वय ८) याच्या सायकलीला पाठीमागून धडक दिली. धडक जोरदार असल्याने आठ वर्षीय पार्थ ट्रेलरच्या चाकाखाली आला व त्याचा जागीच मृत्यू झाला.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे ट्रेलर चालकाविरोधात गुन्हा दाखल करून चालकाला अटक करण्यात आली. अधिक तपास सुरू आहे.



**पनवेल : होळीचा सण ग्रामीण भागात पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

## आरोग्य प्रहर



# व्यायाम आणि आहार

फिटनेसविषयीची जागृती एका वर्गापुरती मर्यादित होती, मात्र आता शारीरिक स्वास्थ्य आणि उत्तम आरोग्य मिळवण्यासाठी तरुण वर्गापासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांचाच व्यायामाकडे कल वाढत आहे. बदलत्या जीवनशैलीमध्ये फिट राहण्यासाठी व्यायाम जितका आवश्यक आहे, तितकेच आहारावर लक्ष देणे गरजेचे आहे. उपाशीपोटी व्यायाम केला पाहिजे, व्यायाम करताना पाणी पिऊ नये, व्यायामानंतर भरपूर खावे अशा अनेक गैरसमजुती लोकांमध्ये असतात.

* शहरातील व्यग्र जीवनामध्ये व्यायाम केव्हा करावा हे सोयीने ठरवावे, मात्र व्यायामाआधी आणि नंतर काय खावे याचे गणित कोणत्याही वेळेस व्यायाम केला तरी सारखेच आहे.
* व्यायाम करण्याच्या सुमारे अर्धा तास आधी हलका आहार घ्यावा, ज्यामध्ये कोणतेही एखादे फळ खाल्ल्यास उत्तम. फळामध्ये असलेली कार्बोहायड्रेट आणि पाणी व्यायाम करताना शरीरातील ऊर्जा टिकवून ठेवतात. दोन ते तीन खजूर आणि लिंबूपाणी प्यायले तरी चालेल.
* व्यायामादरम्यान पाणी पिऊ नये हे साफ चुकीचे आहे. व्यायाम करताना येणाऱ्या घामावाटे शरीरातील पाणी कमी होत असते. अशा वेळी पाण्याची शरीराला आवश्यकता असते. त्यामुळे व्यायाम करताना पाणी प्यावे. पाण्याऐवजी काळे मीठ घातलेले लिंबूपाणी प्यायले तरी चालेल.
* व्यायामानंतर बऱ्याचदा लोक घरी गेल्यावर जेवणाच्या ताटावर बसतात. व्यायाम करून घरी आल्यानंतर आंघोळ करावी. त्यामुळे शरीराला थोडा आराम पडतो. त्यानंतर साधारणपणे प्रथिनयुक्त पदार्थ थोड्या प्रमाणात खावेत. यामध्ये चणे, शेंगदाणे (फक्त मूठभर) खावेत, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रथिने शरीराला मिळतात. अंजीरसारखे सुके फळ खाल्ले तरी चालेल, परंतु हा आहार थोडकाच असावा. यानंतर साधारण अर्ध्या तासाने जेवण किंवा न्याहरी करावी.
* जिममध्ये जाणाऱ्यांना बहुतांश वेळा प्रथिने असलेले शेक किंवा पावडर खाण्यास दिल्या जातात. अशा प्रकारच्या पावडर या जंकफूडप्रमाणे असून यापेक्षा ताजी फळे आणि भाज्या खाणे केव्हाही चांगले.
* व्यायामाच्या आधी किंवा नंतरच्या आहारामध्ये लिंबूपाणी किंवा कोकम सरबत अशी पेये घेत असाल तर त्यामध्ये साखर शक्यतो कमीच वापरा.

# कर्जत अभियांत्रिकी कॉलेजचा पदवीदान समारंभ उत्साहात



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ कर्जत अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये नुकताच पदवीदान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ३५० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रकाश ब्राह्मणकर यांनी या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. विलास पिल्लेवान यांनी महाविद्यालयाचा शैक्षणिक अहवाल सादर केला. प्रा. अनुप कुंटे यांनी प्रास्ताविक केले. आपण निवडलेल्या क्षेत्रात एक नंबरला राहण्याचा प्रयत्न करा व मेहनत करून संधीचे सोने करा, असा सल्ला महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे यांनी या वेळी विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस. व्ही. भगत यांनी केले. उरण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य राजेश लाड, प्रकाश पालकर, दीपक बोराडे, ज्ञानेश्वर जाधव, उपप्राचार्य राजकुमार नारखेडे, प्रा. जी. एस. धानोरकर, प्रा. एस. एम. पाटील, प्रा. जी. व्ही. दाखवे संदीप लाड, राहुल देशमुख, अनिल घरत, गजानन लाड, निश्चल शिंदे, किरण पाटील आदी या वेळी उपस्थित होते.

---

प्रोसेस जमा ता.

मुजावर सो. कोर्ट
ॲड. इर्शाद रमझान शेख पनवेल
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात...**

दि.चौ.अर्ज.क्र.३६८/२०२२
नि. ८/ड
ने.ता. २९/०४/२०२२

१) श्री. ज्ञानेश्वर धर्मा पाटील,
वय- ५९ वर्षे, धंदा- शेती,
रा. घर क्र. ३६५/२, पेठाली,
तळोजा मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड
२) श्री. तुकाराम धर्मा पाटील,
वय- ४८ वर्षे, धंदा- शेती,
रा. पेठाली गाव, पो. तळोजा पाचनंद,
ता. पनवेल, जि. रायगड
३) श्री. गजानन धर्मा पाटील,
वय- ४५ वर्षे, धंदा- शेती,
रा. घर क्र. ३६४, पेठाली गाव,
पो. तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड
४) सौ. मुक्ताबाई ज्ञानदेव भोईर,
वय- ५८ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. घर क्र. ७७५, भोईर पाडा, दत्तमंदिरजवळ,
तळोजा मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड
५) श्रीमती. सुवर्णा पंडित राजे,
वय- ४९ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. मु. तळोजा मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड
६) सौ. अरुणा नामदेव पाटील,
वय- ४२ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. मु. नितळस, पो. वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड

... अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ ते ६ यांचे वडील कै. धर्मा नारायण पाटील यांचे दि. २१/०४/२०२१ रोजी मौजे-पेठाली, ता. पनवेल, जि. रायगड येथे देहावसान झाले आहे. कै. धर्मा नारायण पाटील यांची पत्नी कै. अनुबाई धर्मा पाटील यांचे दि. ३१/१२/१९९५ रोजी देहावसान झाले आहे. तसेच कै. धर्मा नारायण पाटील यांची आई जमुनाबाई नारायण पाटील यांचे देखील सुमारे ४० वर्षापूर्वी देहावसान झाले आहे. परंतु त्याबाबतचा कोणताही दाखला उपलब्ध नाही. कै. धर्मा नारायण पाटील यांचे मृत्युपश्चात त्यांना हिंदु कायद्यातील तरतुदींनुसार अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. श्री. ज्ञानेश्वर धर्मा पाटील वगैरे ह्यांनी कै. धर्मा नारायण पाटील यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

कै. धर्मा नारायण पाटील यांच्या नावे असलेल्या मौजे-तळोजा पाचनंद, ता. पनवेल, जि. रायगड येथील मिळकती महाराष्ट्र शासनाने संपादनात समाविष्ट केलेल्या आहेत. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे-

| अनु. क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | १४-तळोजा पाचनंद | १८६ | १(२) | ०-१०-६ |

सदरहू मिळकतींचे संपादनाचे मोबदल्यापोटी मे. सिडको लि. यांचेकडून मिळणारा भूखंड, नुकसान भरपाई आणि इतर फायदे.

वर श्री. ज्ञानेश्वर धर्मा पाटील वगैरे हे कै. धर्मा नारायण पाटील यांचे कायदेशिर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट श्री. ज्ञानेश्वर धर्मा पाटील वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. धर्मा नारायण पाटील यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक १७/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**लिपिक**
दिवाणी न्यायालय व.स्तर पनवेल

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर पनवेल

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मूळ मालक यांच्याकडून कायमस्वरुपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-लोणिवली, ता. पनवेल, जि.रायगड**

| अनु. क्र. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | १५ | १ | ०-१०-० पो.ख. ०-०३-० एकूण ०-१३-० | ०.१६ | श्री. तुकाराम नथु पाटील<br>श्री. नाना नथु पाटील<br>श्री. अशोक नथु पाटील<br>श्रीम. मनिषा विठ्ठल पाटील<br>श्रीम. पार्वतीबाई नथु पाटील |
| २. | १५ | ३ | ०-३५-९० पो.ख. ०-०२-० एकूण ०-३७-९० | ४.३१ | |
| ३. | १६ | ३ | ०-८३-० पो.ख. ०-१९-० एकूण १-०२-० | ५.५६ | |
| ४. | १६ | ७ | ०-१०-१० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-११-१० | ०.७८ | |
| ५. | १६ | ८ | ०-०१-०० पो.ख. ०-००-५० एकूण ०-०१-५० | ०.०३ | |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :- १७/०३/२०२२**

**सही/-**
**ॲड. भुषण मोरेश्वर म्हात्रे**

पत्ता : ऑफीस नं. १४६, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजीमार्केट जवळ, पनवेल, जि. रायगड, मो. ९८९२२२२२५७

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022649**<br>**Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-5/2022-2023**<br>RFx E-tender for hiring of vehicle at 220kV Tambati substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022660**<br>**Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-6/2022-2023**<br>RFx E-tender for hiring of vehicle at 220kV Uran substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022661**<br>**Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-7/2022-2023**<br>RFx E-tender for hiring of vehicle at 220kV Wadkhal substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022662**<br>**Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-8/2022-2023**<br>RFx E-tender for hiring of vehicle at 220kV Apta substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022663**<br>**Tender No.: EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-9/2022-2023**<br>RFx E-tender for hiring of LMV vehicle at EHV Lines Maint S/sdnPanvel,(Ist Vehicle) under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022664**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-10/2022-2023**<br>RFx E-tender for hiring of LMV vehicle at EHV Lines Maint S/sdnPanvel,(IInd Vehicle) under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022665**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-11/2022-2023**<br>RFx E-tender for hiring of vehicle at EHV Substation Maintenance Sub-Division Apta under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022666**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-12/2022-2023**<br>RFx E-tender for hiring of LMV vehicle at EHV Substation Maintenance Sub-Division Apta under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022667**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-13/2022-2023**<br>RFx E-tender for hiring of vehicle at 100kV Taloja substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022668**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-14/2022-2023**<br>RFx E-tender for hiring of vehicle at 100kV Thal substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022669**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-15/2022-2023**<br>RFx E-tender for hiring of vehicle at 100kV Khopoli & Bhokarpada substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| S.N. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000022670**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-16/2022-2023**<br>RFx E-tender for hiring of vehicle at 100kV Patalganga & Jite substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2022 to 31.03.2023.<br>**Tender amount Rs. 5,99,992/- EMD amount Rs. 6,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.03.2022, 17:00 Hrs. to 24.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 24.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **25.03.2022 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

